# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**मंगळवार, दिनांक २३ जून, २०२६**

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : अध्यक्षांनी, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करणे.**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"विशिष्ट धर्मातील कुप्रथा बंद करण्यासाठी महिलांवरील अत्याचार थांबावे म्हणून मा. पंतप्रधान यांनी तिहेरी तलाक पद्धती बंद करण्याचा कायदा संमत करणे, महाराष्ट्रात मात्र या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली जात नसणे, मुस्लिम पुरुषांकडून अनेक महिलांशी विवाह करण्यात येणे, महिलांनी तलाक द्यावा यासाठी घरच्यांकडून अत्याचार करण्याच्या प्रकरणांमध्ये झालेली लक्षणीय वाढ, मुस्लिम महिलांवर पतीकडून प्राणघातक हल्ले करण्याची प्रकरणे समोर येणे, नाशिक येथील शबाना शबुद्दीन खान या महिलेला देखील तलाक देण्यासाठी तिच्या नवऱ्याकडून जीवे मारण्याचा प्रयत्न केला जाणे, पोलीस निरीक्षक महिला सुरक्षा कक्ष,नाशिक यांच्याकडे तक्रार करण्यात येऊनही कारवाई न करणे, तसेच मलिक अश्रफ समशेर या व्यक्तीने देखील टेलिफोनवर तिहेरी तलाक दिला म्हणून पोलीस विभागाकडे तक्रार केल्याचा राग येऊन पत्नीवर प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, सरकारवाडा पोलीस स्टेशनला याबाबत नोंद असणे, अशाच प्रकारच्या तक्रारी शबाना शबुद्दीन खान, मिनाज अश्रफ मलिक यांनी गुन्हे शाखा, नाशिक येथे करणे, मुस्लिम महिलांच्या मुलांच्या शिक्षणाचा, संगोपनाचा व संस्कारांचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, यातून निर्माण झालेली सामाजिक समस्या, वाढती गुन्हेगारी,अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी शासनाने या मुस्लिम महिलांना संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करण्याची असणारी आवश्यकता, याकडे शासनाचे होत असणारे गंभीर दुर्लक्ष, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

रोटा/एचबी-०१४८ (२७००-०६-२०२६)

**(२) सर्वश्री. अतुल भातखळकर, सुधीर मुनगंटीवार, सुनिल प्रभू, जयंत पाटील, आदित्य ठाकरे, गजानन लवटे, नितीन देशमुख, डॉ.जितेंद्र आव्हाड, श्री. रोहित पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चंद्रपूर जिल्ह्यामधील सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात तेंदुपत्ता संकलनासाठी गेलेल्या ७ महिलांवर वाघाने केलेल्या हल्यात ४ महिलांचा मृत्यू झाल्याची दिनांक २२ मे, २०२६ रोजी घटना घडलेली असणे, गतवर्षी १० मे, २०२५ रोजी सिंदेवाही तालुक्यात ३ महिलांचा वाघाने बळी घेणे, वर्षभरानंतरही वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावर ठोस उपाययोजना न केल्यामुळे पुन्हा ४ महिला वाघांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडणे, तसेच नागभीड तालुक्यातील किटाळी मेंढा परिसरात दिनांक १९ मे, २०२६ रोजी तेंदूपत्ता संकलनासाठी जंगलात गेलेल्या एका ६६ वर्षीय महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू होणे, मागील चार महिन्यांत नागभीड तालुक्यात वाघांच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्यांची ही चौथी घटना असणे, यापूर्वीही ईरव्हा टेकरी, तळोधी व मिथुर परिसरात अशाच घटना घडल्याने मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र झाल्याचे स्पष्ट होणे, विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, नागपूर आणि अमरावती जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने तेंदुपत्ता संकलनाचे काम करण्यात येत असणे, वन विभागाने यंदा चंद्रपूर जिल्हयासाठी सुमारे ३० हजार गोणी तेंदुपत्ता संकलनाचे उदिष्ट निश्चित केले असणे, त्याकरिता ३० वन क्षेत्रामध्ये युनिट्स तयार करण्यात येणे, तथापि तेंदूपत्ता हंगामादरम्यान हजारो नागरिक जंगलात जात असताना सुरक्षेसाठी प्रभावी यंत्रणा अपुरी असल्याचे निदर्शनास येणे, या घटनांमुळे परिसरात भीती व दहशतीचे वातावरण निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर संवेदनशील भागांत विशेष गस्त व बचाव पथके तैनात करणे, वाघांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे, मृतांच्या कुटुंबीयांना वाढीव आर्थिक मदत देऊन पुनर्वसन करणे, तसेच मानव-वन्यजीव संघर्षावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वने मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वणवा आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करताना रत्नागिरी जिल्ह्यातील मौजे मुर्शी (ता.संगमेश्वर), मौजे निळीक (ता.खेड), प्रभानवल्ली (ता.लांजा) येथे तीन वृद्धांचा माहे मार्च, २०२६ मध्ये, मौजे गाणे-खड्पोली (ता.चिपळूण) येथील वृद्ध महिलेचा माहे एप्रिल, २०२६ च्या पहिल्या सप्ताहात तसेच ठाणे जिल्ह्यातील खेडले (ता. मुरबाड) येथे एका वृद्ध व्यक्तीचा होरपळून मृत्यू झाल्याच्या अत्यंत गंभीर घटना घडणे, रत्नागिरी जिल्हा आणि संपूर्ण कोकण परिसरात उन्हाळ्याच्या दिवसांत जाणीवपूर्वक लावल्या जाणाऱ्या वणव्यांमुळे होरपळून मृत्यू होण्याच्या दुर्दैवी घटनांमध्ये झालेली चिंताजनक वाढ, वणव्यांमुळे दरवर्षी मौल्यवान वनसंपदा, दुर्मिळ औषधी वनस्पती आणि वन्यजीव जळून खाक होणे, आंबा आणि काजूच्या बागांना मोठा फटका बसून शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होणे, वणवे रोखण्यासाठी वन विभागाच्या वतीने जनजागृती केली जात असली तरी, स्थानिकांचा सहभाग आणि

कठोर उपाययोजनांची नितांत गरज असणे, वणवा लावणे किंवा जंगलाला आग लावणे हा गंभीर गुन्हा असताना वन्यजीव आणि जैवविविधतेला धोका निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांवर कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये असलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घेऊन वेळीच केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**पाच : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६

---

(२) **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, श्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** **(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, श्री.साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सहा : सर्वश्री रणधीर सावरकर, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, चेतन तुपे, गोपिचंद पडळकर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अर्जुन खोतकर, राजकुमार बडोले, बबनराव लोणीकर, दिपक केसरकर, संजय बनसोडे, डॉ.संजय कुटे, डॉ.तानाजी सावंत, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री प्रविण दटके, राजेंद्र गावित, शेखर निकम, अभिमन्यु पवार, विजय शिवतारे, प्रताप पाटील-चिखलीकर, श्रीमती सीमा हिरे, श्री.राजेश क्षिरसागर, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री सुरेश धस, प्रदिप जैस्वाल, दिलीप बनकर, डॉ.अतुल भोसले, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री सत्यजित देशमुख, विलास तरे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, चंद्रदीप नरके, राजेश विटेकर, संभाजी पाटील-निलंगेकर, सुनिल शेळके, चैनसुख संचेती, नरेंद्र भोंडेकर, चंद्रकांत नवघरे, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री मंगेश कुडाळकर, काशिनाथ दाते, डॉ.आशिष देशमुख, सर्वश्री किशोर पाटील, सचिन पाटील, देवराव भोंगळे, शांताराम मोरे,**

**मनोज कायंदे, रत्नाकर गुट्टे, प्रकाश सुर्वे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री किशोर जोरगेवार, निलेश राणे, संतोष दानवे, तुकाराम काते, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री अशोक पाटील, मंगेश चव्हाण, चंद्रकांत सोनवणे, सुरेश भोळे, बालाजी कल्याणकर, विक्रम पाचपुते, सुहास कांदे, राघवेंद्र पाटील, संजय गायकवाड, सुभाष देशमुख, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री सुनिल कांबळे, महेंद्र थोरवे, ॲड.राहुल कुल, सर्वश्री महेंद्र दळवी, अमल महाडिक, चंद्रकांत पाटील, मनोज घोरपडे, संतोष बांगर, हरिष पिंपळे, विश्वनाथ भोईर, प्रताप अडसड, दिलीप लांडे, महेश लांडगे, महेश शिंदे, राजेश वानखडे, आमश्या पाडवी, प्रविण तायडे, हिकमत उढाण, मोहन मते, बाबुराव कदम-कोहळीकर, सिध्दार्थ शिरोळे, अमोल खताळ, नारायण कुचे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रमेश कराड, आनंद तिडके, सुमित वानखेडे, मुरजी पटेल, समीर कुणावार, अमोल पाटील, राणाजगजितसिंह पाटील, सुहास बाबर, डॉ.सुरेश खाडे, सर्वश्री विलास भुमरे, कृष्णा खोपडे, राजेश मोरे, चरणसिंग ठाकूर, विठ्ठल लंघे, राजेश पवार, किरण सामंत, डॉ. तुषार राठोड, डॉ. अशोकराव माने, श्रीमती नमिता मुंदडा, ॲड.श्रीजया चव्हाण, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री शरद सोनावणे, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री विनोद अग्रवाल, किर्तीकुमार भांगडिया, उमेश यावलकर, अमोल जावळे, काशिराम पावरा, शिवाजी पाटील, रवी राणा, सचिन कल्याण-शेट्टी, विजय देशमुख, शंकर जगताप, राहुल आवाडे, विजय रहांगडाले, देवेंद्र कोठे, अनुपभैय्या अग्रवाल, सुधीर गाडगीळ, हेमंत रासने, श्रीमती सई डहाके, सर्वश्री राजू तोडसाम, किसन वानखेडे, संजय पुराम, भीमराव केराम, श्याम खोडे, समीर मेघे, जितेश अंतापुरकर, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"सन १९४७ मध्ये देशाला स्वातंत्र मिळाल्यानंतर आतापर्यंत अतिवृष्टी, अनावृष्टी, विषाणूजन्य रोग इ. मुळे शेतकरी बांधव व शेतीव्यवसाय अनेकवेळा अडचणीत येणे परंतु, सन २०१४ पर्यंत तत्कालीन शासनाने राज्य शासनाच्या तिजोरीतून एकदाही कर्जमाफी न देणे, सन २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर पहिल्यांदा राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना राबवून लाखो शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, २०२०-२०२१ मध्ये तत्कालीन राज्य शासनाने महात्मा ज्योतीबा फुले कर्जमुक्ती योजना जाहिर करणे परंतु कर्जाची मर्यादा २ लाख असल्याने अधिक कर्ज घेतलेल्या शेतक-यांचा त्यात समावेश नसणे, परिणामी लाखो शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून वंचित असणे, सन २०२४ मध्ये घोषणा केल्याप्रमाणे शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहिर करणे मात्र, या योजनेमध्ये दोन लाखांवर कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचाही समावेश असणे, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी रु.५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना समाविष्ट असणे,

यासोबतच आत्महत्याग्रस्त जिल्हयातील प्रमुख पिक असलेल्या कापसाच्या उत्पादन वाढीसाठी 'कापूस उत्पादकता मिशन' ची केंद्रे स्थापन करण्याचे प्रयोजन असणे, अल निनोनच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाच्या कामांना गती देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी एप्रिल, २०२६ मध्येच घेऊन व त्यासंदर्भात बैठक घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देणे, त्याअनुषंगाने जलयुक्त शिवार टप्पा २ च्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यामध्ये जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात करण्यात येणे, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सर्वांचा सहभाग घेऊन लोकचळवळ उभी करण्याची आवश्यकता, राज्यात 'नमो शेतकरी महासन्मान योजना', 'कृषी समृध्दी योजना', 'महाडिबीटी एकत्रित प्रणाली', 'महिला शेतकरी व गोपालकांसाठी योजना' राबविण्यात येणे, शेतीत फवारणी, पिक निरिक्षण, किड नियंत्रण, जमिनीचे विश्लेषण इ. साठी ड्रोन व रोबोटिक्सचा वापर करण्यात येणे, हवामानातील अनियमितता, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी इ.चा सामना करता-करता शेतकऱ्यांच्या जीवनातील स्थैर्य हरवू नये याकरिता नैसर्गिक आपत्ती, किड व रोग इ. बाबींपासून विमा संरक्षण देणे व नुकसानीच्या प्रमाणात नुकसान भरपाई देणे, शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य राखणे याकरिता प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत राज्यातील अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी, उत्पादनावर आधारित सुधारित पिक विमा योजना राबविण्यात येणे, शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी मोठी भांडवली गुंतवणूक करण्याचे शासनाचे प्रयोजन असणे, गोपीनाथ मुंडे अपघात अनुदान योजनेचा विस्तार करुन त्यात शेतमजुरांनाही विमा संरक्षण देण्यात येणे, 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना' राबविण्यात येणे, संपूर्ण राज्यात 'महाराष्ट्र  नैसर्गिक शेती अभियान' राबविण्यात येणे, अशाप्रकारे राज्यातील शेतकरी स्वयंपूर्ण व कर्जमुक्त होण्याच्या दृष्टीने आणि नैसर्गिक बदलाचा सामना करण्यास सक्षम होण्याच्या दृष्टीने राज्य  शासनाने घेतलेले निर्णय व त्याबाबत करावयाची उपाययोजना."

**सात : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी बॅलेटद्वारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (क्रमांक १ व २)**

**(१) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याबाबत" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २४ मधील प्रश्न क्रमांक १९१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील शासकीय कामकाज मराठी भाषेत करणेबाबत" या विषयावरील श्री.मनोज जामसुतकर, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१०४७ ला दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २२ जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.